# अदानी इलेक्ट्रिसिटीचा 'सिलिंग फॅन' उपक्रम सुरू

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

ऊर्जा बचत करणाऱ्या सिलिंग फॅन या उपक्रमाला यश मिळाल्यानंतर एईएमएलने यंदा देखील ग्राहकांसाठी हा उपक्रम सादर केला आहे. हे पंखे ग्राहकांना वीज बचत करण्यामध्ये मदत करतात. हे सिलिंग पंखे सरासरीपेक्षा ५० टक्के कमी विजेचा वापर करतात. गेल्या तीन उपक्रमांमध्ये अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडने त्यांच्या ग्राहकांना अनुदानित खर्चामध्ये २५ हजार सिलिंग पंखे आणि ६५०० रेफ्रिजरेटर्सचे वितरण केले होते. यंदा कंपनी ५० हजार सिलिंग पंख्यांसह उपक्रम सादर केला आहे.

कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी करण्यासोबत ऊर्जा बचतीला आणि स्थिर वापराला चालना देण्याच्या उद्देशाने वीज कंपनी हा उपक्रम अधिक सक्षम करत आहे. बाजारपेठेमध्ये ऊर्जा बचत करणाऱ्या उपकरणांची किंमत अधिक असल्यामुळे एईएमएलने खरेदीवर २५ ते ३० टक्क्यांची सूट देत ही उपकरणे अधिक सुलभपणे उपलब्ध करून दिली आहेत. हा उपक्रम अदानी इलेक्ट्रिसिटीच्या वितरण भागांमधील सर्व निवासी ग्राहकांसाठी उपलब्ध असेल, अशी माहिती एईएमएलच्या प्रवक्त्याने दिली. अदानी इलेक्ट्रिसिटी ग्राहक १९१२२ या क्रमांकावर एईएमएल कस्टमर केअर सेंटरशी संपर्क साधत उपक्रमासाठी नोंदणी करू शकतात. याशिवाय, (www.adanielectricity.com) वेबसाइटवरील नोंदणी फॉर्म भरू शकतात.